divyamarathi.com

# केटीएचएममध्ये आजपासून राज्यस्तरीय कार्यशाळा

## डिझाइन अॅण्ड डेव्हलपमेंटसंदर्भात नाशकात प्रथमच कार्यशाळा

**प्रतिनिधी । नाशिक**

मराठा विद्या प्रसारक समाज संचलित गंगापूररोड येथील केटीएचएम महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने डिजिटल लायब्ररी अंतर्गत "डिझाइन अँड डेव्हलपमेंट ऑफ इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटोरीज युजिंग डिस्पेस' या विषयावर दोनदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा शनिवार दि. ३ व रविवार ४ डिसेंबर रोजी महाविद्यालयाच्या व्हीएलसी सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे.

कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालयाचे मुख्य ग्रंथपाल डॉ. राजेंद्र कुंभार, पुण्याचे गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे ग्रंथपाल डॉ. नानाजी शेवाळे, वैद्यकशास्त्राच्या प्राध्यापिका व पेटेंट सल्लागार प्रा. डॉ. मृदुला बेळे, पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या अधिकारी डॉ. सुनीता बर्वे, संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार, चिटणीस डॉ. सुनील ढिकले उपस्थित राहणार आहे.

डीस्पेस हे फ्री टू युज आणि ओपन सोर्स सॉफ्टवेअर असून, त्याच्या माध्यमातून मजकूर, प्रतिमा, ऑडिओ व व्हिडिओ याचा उपयोग करणे सुलभ होणार आहे. नाशिकमध्ये प्रथमच होणाऱ्या या कार्यशाळेसाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी ग्रंथपाल व कार्यशाळा समन्वयक संजय आहेर यांच्याशी ९८२२१७३४३४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.